गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन



भारती विद्यापीठाचे

डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय,सांगली

# संवाद-भारती

**A Tri - Monthly News Letter**

Jan -Mar :2017



१३ जानेवारी

८ जानेवारी

# वाढदिवस विशेषांक

## जानेवारी-२०१७


संपादक मंडळ

अध्यक्ष : डॉ.डी.जी.कणसे

मुख्य संपादक : डॉ.संतोष माने

कार्यकारी संपादक :प्रा.अमोल वंडे

सदस्य:

डॉ.बी.डी.पाटील

प्रा.एम्.एच्.पाटील

संवाद भारती विशेष

# लॉग-इन : स्पर्धा परीक्षांचे

नुकताच आयपीएस झालेला प्रतीक ठुबे. बँकिंग, स्टाफ सिलेक्शन कमिशन यांच्यासाठी इंग्रजीचा सराव करावा लागतो, पण तो फारसा कठीण नसतो.

यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून अनेक सरकारी नोकऱ्यांची उत्तम संधी विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहे. पण या संधी नेमक्या कशा मिळवाव्यात याविषयी हजारो विद्यार्थी अजूनही अंधारात आहेत. यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांबाबत आजही अनेकांच्या मनात गैरसमज आहेत. स्पर्धा परीक्षांच्या यशाचा मार्ग नेमका कसा प्राप्त करावा, याविषयी मार्गदर्शन करणारा हा लेख. स्पर्धा परीक्षेची नेमकी पद्धती काय असते, ती कशी द्यायची, त्याचे



वेगवेगळे टप्पे कोणते, यांसारख्या अनेक प्रश्नांचा आढावा घेऊ या.

सर्वांची लहानपणीची स्वप्ने वेगळीच असतात. पण जसे आपण मोठे होतो, तशी क्षितिजे विस्तारत जातात. लहानपणीची स्वप्ने छोटी असतात, मोठेपणीची मोठी. अशीच एक स्वप्नवत संधी म्हणजे तरुणपणीच उच्चपदस्थ सरकारी अधिकारी म्हणून काम करणे. तुम्ही जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, इन्कम टॅक्स आयुक्त, अबकारी आयुक्त अशा पदांबद्दल ऐकले असेलच. किमान तुम्ही सुती कपडे, फॉर्मल पँट व ट्राऊजर घातलेला एखादा अधिकारी मोटारीतून ऐटबाजपणे उतरताना बघितलाच असेल. निदान त्यांचा दबदबा तर कानी नक्कीच आला असेल.

अनेकदा पदवीपूर्वी स्वप्रतिमा व स्वप्ने याबद्दल चित्र स्पष्ट नसते. किंबहुना अनेकदा शैक्षणिक महत्त्वाकांक्षा हलुहळू जागी होते. पण तोपर्यंत काही क्षेत्रे आधीच मागे पडलेली असतात. अशावेळी पुढे गेलेल्यांना गाठण्याची संधी म्हणजे स्पर्धा परीक्षा. रॉकेट लॉंचिंगच्या स्थानकावरून जसे रॉकेट अवकाशाकडे उसळी घेते, तशी मोठी झेप यातून घेता येते. सरकारी क्लास वन व सुपर

•

क्लास वन अशा प्रकारची पदे त्यातून मिळतात. एक स्थिर व तरीही आव्हानात्मक करिअर तुमच्यापुढे उभे राहते. सरकारी काम करताना लोकांसाठी थेट व परिणामकारक बदल घडवून आणता येतात. समाजात किर्ती व आदर प्राप्त होतो. या सदरातून सरकारी सेवांच्या स्वप्नवत करिअरची माहिती आपण घेणार आहोत. करिअर हे एक दीर्घकालीन उद्दीष्ट असते व तिथे ठरवून पोहचावे लागते.

मंझिले अपनी जगह है।

रास्ते अपनी जगह।

ध्येय निश्चित केल्यास वाटचाल करणे सोपे आहे. आयएसएस, आयपीएस, परराष्ट्र सेवा, राजस्व सेवा अशा सरकारी सेवेत काम करणे म्हणजे थेट देशसेवाच! मात्र मग स्वप्न व वास्तव यातील दरी कशी ओलांडायची? ती ओलांडता आली नाही तर? अनेक प्रश्न तरुण-तरुणींसमोर उभे राहतात. आपण प्रमुख प्रश्न व त्यांची उत्तरे शोधून पाहू. ज्यांना पदवीपरीक्षेत खूप गुण मिळतात, त्यांनाच या परीक्षा देता येतात का? नाही. पास क्लासचे गुण असले किंवा अगदी ATKT करत पदवी झाली असेल तरी चालते. अशाप्रकारची पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी यशस्वीही झाले आहेत. बदलापूरचा संजय सुतार सरासरी शैक्षणिक गुणवत्ता असलेला होता. बीएससी नापास झाल्यामुळे तर त्याचे वर्ष वाया गेले होते. पण संजय आता भारतीय परराष्ट्र सेवेत महत्त्वाच्या पदावर काम करीत आहे.

दुसऱ्या विद्यापीठाची पदवी चालते का? होय. अगदी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी चालते.

मराठी भाषेतून या परीक्षा देता येतात का? हो आयएएसची परीक्षा मराठीतूनही देता येते. महाराष्ट्रातून मराठीतून परीक्षा देऊन उच्चपद प्राप्त करणाऱ्यांची मोठी परंपराच आहे. जसे भूषण गगराणी, विश्वास नांगरे-पाटील, अजित जोशी,

महाराष्ट्राबाहेर काम करावे लागते का? जर परराष्ट्र सेवेत असाल तर देशाबाहेरही काम करावे लागते. एक यशस्वी विद्यार्थी नितीन येवला अफगाणिस्तानात काम करत आहे. खरोखर ते तितके कठीण नसते. सरकार सर्व प्रकारच्या सुविधा पुरवते. महाराष्ट्राबाहेर किंवा देशाबाहेर काम करण्याचा मुद्दा प्रामुख्याने प्रशासकीय सेवा (आयएएस), पोलिस सेवा (आयपीएस) व परराष्ट्र सेवा (आयएफएस) यांना लागू होतो. बाकी सर्व सेवांची नेमणूक आपल्याच राज्यात होते. त्यामुळे या मुद्द्याचा बाऊ करण्याचे कारण नाही.

निवड होण्यासाठी लाच द्यावी लागते का? हा एक अगदी सामान्य गैरसमज आहे. या परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) अशा तटस्थ व पारदर्शक पद्धतीने काम करणाऱ्या संस्थांकडून घेतल्या जातात. त्यांची व्यावसायिकता व सचोटी वादातीत असते. गेल्या अनेक वर्षांचा निकाल पाहिल्यास इतक्या सामान्य घरातील मुले यशस्वी झालेली दिसतील की, हा गैरसमज तिथेच गळून पडेल. नितीन जावळे आयएएस होण्यापूर्वी घाटकोपरला झोपडपट्टीसारख्या ठिकाणी एका खोलीत रहायचा. मी स्वत: त्याच्या घरी गेलेलो आहे.

अभ्यास खूप कठीण असतो का? अभ्यास कठीण असे म्हणता येणार नाही, पण विषयांमध्ये विविधता असते. प्रश्न विचारताना चालू घडामोडींशी जोडून प्रश्न विचारले जातात. त्यामुळे काहींना या परीक्षा अनाकलनीय व कठीण वाटतात. पण प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेऊन अभ्यास केल्यास कठीण काहीच नाही. उलट या परीक्षांच्या अभ्यासातून जितके शिकायला मिळते ते इतर कोणत्याही कोर्समधून मिळत नाही. अगदी एमबीए, सीए, लॉ अशा कोर्सेसपेक्षाही या परीक्षांतून जास्त शिकायला मिळते. यातून व्यक्तिमत्वाची जी जडणघडण होते, ती अतुलनीय असते.

परीक्षेत यश मिळतेच याची खात्री काय? जर मनापासून अभ्यास केला असेल तर पदप्राप्ती होईलच असे आपण म्हणू शकतो. पण धोका तर असतोच. पण धोका कुठे नसतो? **'If you fail to take a risk, then that itself is a biggest risk'.**

मंझिले उन्ही को मिलती है

जिनके कदमों में जान होती है।

पंखोसे सें नही,

हौसलोंसे उडान होती है।

तुमचे इतर मित्रमैत्रिणी काट्याकुट्यातून पायवाटेने फिरत असताना, या स्पर्धा परीक्षा तुम्हाला मात्र एक्स्प्रेस वेवर आणून सोडतात. तर मग तयार आहात या भन्नाट प्रवासासाठी? आहे धमक हे शिवधनुष्य पेलण्याची? असेल तर यापुढे आपण या सदरातून या परीक्षांचे तंत्र व मंत्र उलगडत नेऊ. जर लॉगइन केले असेल तर हा परीक्षांचा चक्रव्यूह भेदायचा पासवर्ड तुम्हाला एकेका लेखातून मिळत जाईल.

अमृतमहोत्सवी
स्थापना १९३९
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
सांगली
गुरुवार । दि. १९ जानेवारी २०१७ ।

# स्वप्नांना कष्टाची जोड द्या, यश तुमचेच आहे

## अभिनेते विजय पटवर्धन यांचे प्रतिपादन; भारतीयम् कला महोत्सवाचे उद्घाटन

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली परिसरातील विद्यार्थ्यांना भारतीयम्च्या माध्यमातून कला सादर करण्यासाठी एक चांगले व्यासपीठ उपलब्ध झालेले आहे. परंतु केवळ स्वप्ने न पाहता त्या स्वप्नांना कष्टाची जोड दिल्यास यश तुमच्या पायाशी येईल, असे प्रतिपादन अभिनेते विजय पटवर्धन यांनी केले.

भारती कला अकादमी, पुणे संचलित डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वतीने भारतीयम् कलामहोत्सवाचे उद्घाटन पटवर्धन यांच्याहस्ते झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी भारती विद्यापीठाच्या शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा सौ. विजयमाला कदम होत्या.



सांगली : भारतीयम् कला महोत्सवाचे उद्घाटन रिमोट कंट्रोलच्या सहाय्याने करताना अभिनेते विजय पटवर्धन. सोबत सौ. विजयमाला कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, एच. एम. कदम, प्रा. दत्ता ढोणे.

(छाया : सचिन सुतार)

विजय पटवर्धन म्हणाले, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी पुणे, मुंबई, नाशिक आणि औरंगाबाद येथे स्पर्धा भरविल्या जातात. सांगलीसारख्या भागात अशा स्पर्धा होत नाहीत. परंतु भारती विद्यापीठाने भारतीयम्च्या माध्यमातून सलग दहा वर्षे या स्पर्धा भरवून ग्रामीण भागातील मुलामुलींच्या कलागुणांना वाव दिलेला आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. कोणतीही कला ही सहज साध्य होत नाही. सांगलीला नाट्यपंढरी म्हटले जाते. अनेक दिग्गज कलाकारांचा जन्म या ठिकाणी झालेला आहे. अशा ज्येष्ठ कलाकारांचा आदर्श ठेवून त्यांच्याकडून शिकता आले पाहिजे. तरच जीवनात यशस्वी होता येते.

सौ. विजयमाला कदम म्हणाल्या, सांगली परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना कला क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्याचे काम आम्ही भारती विद्यापीठाच्या माध्यमातून केलेले आहे. त्याचा आतापर्यंत अनेक कलाकारांना फायदा झालेला आहे. गेली दहा वर्षे अत्यंत शिस्तबद्धपणे भारतीयम्ची स्पर्धा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजेंद्र उत्तुरकर यांनी आभार मानले. यावेळी भारती विद्यापीठाचे विभागीय संचालक एच. एम. कदम, प्रा. दत्ता ढोणे, प्रा. सौ. प्रभा पाटील आदी उपस्थित होते.

पुढारी | सांगली, गुरुवार
१९ जानेवारी २०१७



सांगली : महोत्सवाचे दीपप्रज्वलन करताना प्राचार्य डॉ. डी.आर. मोरे. सोबत डॉ. एच.एम. कदम, प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे आदी.

# गुणात्मक वाढीसाठी संशोधनात्मक शिक्षणाची गरज : डॉ. डी. आर. मोरे

**सांगली : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणात संख्यात्मक वाढ झाली. परंतु गुणात्मक वाढ कमी प्रमाणात आहे. राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी संशोधनात्मक शिक्षणाची खरी गरज असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन आविष्कार संशोधन महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. मोरे बोलत होते. भारती विद्यापीठाचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम हे अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे, अविष्कार संशोधन समन्वयक डॉ. ए.एम. गुरव, प्राचार्य डॉ. पी.एन. भोसले, प्राचार्य डॉ. आर.जी. कुलकर्णी , डॉ. बी.डी. पाटील, प्रा. एम.एच. पाटील, जिल्हा समन्वयक डॉ. विकास आवळे, डॉ. संतोष माने उपस्थित होते. प्रा. सूर्यकांत बुरुंग, डॉ. अंकुश सरगर, प्रा. भारती भावीकट्टी, प्रा. श्रीकृष्ण मोहिते उपस्थित होते.

पुढारी | सांगली, गुरुवार
२६ जानेवारी २०१७



सांगली : राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त सांगलीत बुधवारी प्रतिज्ञा घेण्यात आली.

(छाया : सचिन सुतार)

# सांगलीत मतदार जागृतीसाठी रॅली, मानवी साखळी

**सांगली : प्रतिनिधी**

मतदान हा प्रत्येक नागरिकांचा हक्क आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी आज येथे केले. यानिमित्त मानवी साखळी व सायकल रॅली काढण्यात आली.

दरबार हॉल येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी शेखर गायकवाड यांच्याहस्ते नवमतदारांना मतदान ओळखपत्राचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा पोलिस अधीक्षक दत्तात्रय शिंदे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, अप्पर जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनाज मुल्ला, प्राथमिक शिक्षणाधिकारी निशादेवी वाघमोडे उपस्थित होते.

प्रास्ताविक मिनाज मुल्ला यांनी केले. यावेळी मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. नसीम झैदी यांचा संदेश चित्रफीतीद्वारे दाखवण्यात आला. तसेच उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात आली.

**मानवी साखळी व सायकल रॅली उत्साहात**

मानवी साखळी व सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त रवींद्र खेबूडकर यांनी स्टेशन चौक येथे हिरवा झेंडा दाखवल्यानंतर सायकल रॅलीस प्रारंभ झाला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनाज मुल्ला, निवडणूक नायब तहसीलदार डी.टी. बिराजदार व एस. एस. विभुते उपस्थित होते. या मानवी साखळी व सायकल रॅलीमध्ये कस्तुरबाई महाविद्यालय, ६ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी, चंपाबेन महाविद्यालय, कदम महाविद्यालय, विलिंग्डन महाविद्यालय, १६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स, गरवारे कन्या महाविद्यालय या महाविद्यालयांमधील विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक यांनी सहभाग घेतला. सायकल रॅलीची सुरुवात स्टेशन चौक येथून होऊन पुढे ही रॅली काँग्रेस भवन, राममंदिर मार्गे पुष्पराज चौक ते परत स्टेशन चौक येथे या रॅलीची सांगता झाली. यावेळी मतदारांसाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील तसेच इतर शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी
र - सांगली ▮ रविवार, १९ फेब्रुवारी २०१७

# कोणत्याही कामाची लाज बाळगू नका

## रामदास फुटाणे; डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण उत्साहात

सांगली / प्रतिनिधी

जीवनात कितीही नैराश्य आले तरी, हार मानू नका, आत्महत्या करु नका. आज देशात व्देषाची भावना वाढत आहे. प्रत्येकाच्या मेंदूत चातुवर्ण्याचे विष कालवले जात आहे. तरुणांनी वाचन संस्कृतीमधून आपल्या क्षमता वाढवल्या पाहिजेत. दाखल्यावरील जात काढली नाही तर भविष्यकाळ अंधारमय आहे. कोणतेही काम हलके समजू नका. कोणत्याही कामाची लाज



सांगली : डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयातील पारितोषिक वितरण कार्यक्रमात बोलताना साहित्यिक रामदास फुटाणे. सोबत प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. एच.एम. कदम आदी. (SAN)

बाळगू नका, असे प्रतिपादन साहित्यिक रामदास फुटाणे यांनी केले.

सांगलीतील डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, प्रा. वैजनाथ महाजन उपस्थित होते.

रामदास फुटाणे म्हणाले, देशातील ८ ते १० बलाढ्य कुटुंबावर हा देश चालवला जात आहे. गरीब लोकांकडे पाहायला कोणाला वेळ नाही, त्यामुळे तरुणांनी स्वतःच स्वतःची प्रगती करावी. स्वप्ने दाखवणाऱ्यांपासून सावध राहण्याचा सल्लाही फुटाणे यांनी यावेळी दिला.

प्रारंभी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अहवाल वाचन प्रा. पी. डी. जगदाळे यांनी केले. यावेळी डॉ. संतोष माने, डॉ. विकास आवळे, डॉ. बी. डी. पाटील यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. एम. एच. कदम यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. एस.ई. बुरुंग यांनी केले. आभार जया कुऱ्हेकर यांनी मानले. यावेळी अजिंक्य कुंभार, प्रा. संजय ठिगळे, डी. डी. चौगुले, प्रतिभा जगदाळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

र - सांगली ▮ रविवार, २९ जानेवारी २०१७

# डॉ. कदम महाविद्यालयाचे अंकलीत श्रमशिबीर

सांगली / प्रतिनिधी

येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मिरज तालुक्यातील अंकली येथे होत आहे.

स्वच्छ भारत, स्वस्थ्य भारत अभियान शाश्वत व सर्वांगिण ग्रामीण विकास या घोषवाक्याने शैक्षणिक वर्ष २०१६ - १७ मधील संपन्न होणाऱ्या या श्रमसंस्कार शिबिरामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे वरिष्ठ विभागाचे १०० तर, कनिष्ठ विभागाचे २५ स्वयंसेवक विद्यार्थी - विद्यार्थीनी, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक यांच्यासमवेत अंकलीतील ग्रामस्थ सहभागी होणार आहेत.

या शिबिराचा उद्घाटन समारंभ शुक्रवार २७ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता भारती विद्यापीठाचे विभागीय मानद संचालक डॉ. एच. एम. कदम यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

यावेळी शिल्पा प्रदीप कोलप यांचे हस्ते तर, छायाताई अशोक सूर्यवंशी, अंकलीचे सरपंच किर्तीकुमार सावळवाडे, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या शिबिरामध्ये उद्घाटन समारंभानंतर सायंकाळी ६ वाजता मधुकर सावंता विसापुरे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, अंकली यांचे मतदार जागृती व मतदान जनजागृती या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान झाले.

रविवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत सुलभा तांबडे यांच्याकडून स्वयंसेवकांना योगा व प्राणायाम प्रशिक्षण तर सायंकाळी ४ वाजता प्रा. पद्माकर जगदाळे यांचे देशाच्या प्रगतीमध्ये युवकाचे स्थान या विषयावर व्याख्यान होणार आहे. सायंकाळी ५ वाजता महिला मेळावा व हळदी कुंकू समारंभ, सोमवार, दि. ३० रोजी प्रा. संजय ठिगळे यांचे डिजिटल इंडिया विषयावर व्याख्यान, मंगळवार ३१ रोजी सकाळी ८ ते १२ आरोग्य शिबीर, तर सायंकाळी ५ वाजता प्रा. श्रीकृष्ण मोहिते यांचे ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर व्याख्यान, बुधवार १ रोजी डॉ. भीमराव पाटील यांचे सुखी जीवनाची गुरुकिल्ली आदी विषयावर व्याख्यान होणार आहेत.

शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता अभियान, व्यक्तिमत्व विकास, व्यसनमुक्ती अभियान आदी उपक्रम होणार आहेत.

पुण्य नगरी

रविवार, १ जानेवारी २०१७

# डॉ. कदम महाविद्यालयाची व्यसनमुक्ती फेरी

सांगली / प्रतिनिधी :

डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नववर्षाच्या पूर्वसंध्येला सांगलीवाडीमध्ये व्यसनमुक्तीसाठी जनजागृतीपर प्रबोधन फेरी काढण्यात आली.

प्रारंभी सोना क्लिनिक व्यसनमुक्ती केंद्राचे डॉ. सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, व्यसनाधिनता हा एक दुर्धर आजार आहे. जगातील ६४ टक्के लोक व्यसनाधीन आहेत. व्यसनामुळे युवा पिढी वाया जात आहे. देश बलशाली व्हायचा असेल तर युवकांनी व्यसनापासून दूर होणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



सांगली : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. डी. जी. कणसे, प्रा. बी. डी. पाटील, प्रा. टी. आर. सावंत, डॉ. नितीन गायकवाड आदी.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सांगलीवाडीमध्ये जनजागृतीपर फेरी काढली. यावेळी त्यांनी विविध घोषवाक्ये लिहलेले फलक लक्षवेधून घेत होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. टी. आर. सावंत, डॉ. जे. व्ही कुऱ्हेकर, प्रा. ए. के. सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्र माच्या यशस्वीतेसाठी प्रा. उज्ज्वला देसाई, प्रा. ए. एन. मोरे, प्रा. प्रदीप डिकुळे, डॉ. नितीन गायकवाड, प्रा. शोभा पाटील, प्रा. सूर्यकांत बुरुंग, डॉ. संतोष माने, प्रा. कुऱ्हाडे, प्रा. गुंडे, प्रा. माने यांनी प्रयत्न केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगली, शुक्रवार, जानेवारी २०१७ । किंमत १ चार ... पाने ३२ (१२+४+१६)

सकाळ

# शिक्षणाला लोकसाहित्याची जोड गरजेची

## डॉ. तारा भवाळकर : सांगलीत ज्ञानभारती साहित्य संमेलनात विचारमंथन

सकाळ वृत्तसेवा

सांगली, ता. ५ : पदवी, पदवीत्तर शिक्षण घेऊन विद्वान झालोत, असे वाटते का, हा प्रश्न विचार करायला लावणारा आहे. या शिक्षणातून केवळ कप्पेबंद विचार निर्माण होतात. ज्ञान मिळवायचे असेल तर कप्पेबंद शिक्षणाबरोबरच लोकसाहित्याची जोड हवीच, असे प्रतिपादन लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांनी आज येथे केले. सांगलीवाडीतील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात आयोजित ज्ञानभारती साहित्य संमेलनाला संमेलनाध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन झाले. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वैजनाथ महाजन, भारती विद्यापीठाचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डी. जी. कणसे यांची प्रमुख उपस्थिती होती.



सांगली : सांगलीवाडीतील पतंगराव कदम महाविद्यालयात गुरुवारी झालेल्या ज्ञानभारती साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी शेखर गायकवाड, लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर, प्रा. वैजनाथ महाजन, एच. एम. कदम, डी. जी. कणसे.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, "लेखन, वाचन आणि साहित्य रसिकांना जोडण्याचे काम करते. ज्ञानातूनच माणूस समृद्ध होतो. लिहिण्या-वाचण्यातून माणसाची कल्पनाशक्ती संपन्न होते. त्यासाठी अशा संमेलनांची गरज शाळा-महाविद्यालयात जाणवत आहे. पाश्चात्त्य देशातील लोक परंपरा जोपासण्याचे काम करतात. भारतीय मात्र आरंभशूर आहेत. म्हणूनच मराठी भाषेचे पहिले पुस्तक मराठी भाषिकांनी नव्हे, तर ख्रिश्चन मिशनरींनी प्रसिद्ध केले."

श्री. गायकवाड म्हणाले, "डिजिटल भाषेमुळे मराठी भाषेतील अनेक शब्द हरवत चालले आहेत. त्यासाठी वाचन चळवळ हाती घेण्याची वेळ आली आहे. नव्या पिढीशी जवळीकता आणण्यासाठी जिल्ह्यात नवे प्रयोग केले जात आहेत. त्यात लेखकांची समिती करून दरवर्षी शंभर पुस्तके प्रकाशित केली जातील. ती संकेतस्थळावर अपलोड करून नव्या पिढीला वाचनाकडे वळविण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी अशा संमेलनांची गरज आहे."

प्राचार्य डॉ. कणसे यांनी प्रास्ताविक केले. साहित्य, समाज, शिक्षण आणि तरुणाई याविषयी परिसंवाद झाला. प्रा. वैजनाथ महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रा. शरद पाटील, ॲड. चिमण लोकूर, प्राचार्या सुलक्षणा कुलकर्णी, विष्णू वासमकर, सुभाष कवडे यांनी भाग घेतला. त्यानंतर लेखनाचा आनंद या विषयावर चर्चासत्र झाली. सायंकाळी कविसंमेलन झाले. प्रा. माणिक पाटील, जया कुऱ्हेकर, संजय ठिगळे, डॉ. संतोष माने, श्रीकृष्ण मोहिते, उज्ज्वला देसाई, बाबूराव खडके यांनी संयोजन केले. प्रा. भीमराव पाटील यांनी आभार मानले. प्रा. प्रभा पाटील, सूर्यकांत बुरुंग यांनी सूत्रसंचालन केले.

